पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ५

**सभावृत्तांत**

दिनांक - **१७/०७/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **१७/०७/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
३. मा.काटे स्वाती(माई)चंद्रकांत
४. मा.चोंधे आरती सुरेश
५. मा.मुंढे उषा अंकुश
६. मा.कुटे निर्मला संजय
७. मा.मंगला अशोक कदम
८. मा.वैशाली जालिंदर काळभोर
९. मा.मिनल विशाल यादव

या शिवाय मा.झगडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) महिला बचत गटांना अर्थसहाय्य अदा करणेच्या अटीशर्ती मध्ये दुरुस्ती करणेबाबत – मा.आरती चोंधे, मा.हिराबाई घुले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळा, कार्यालये व आवश्यक त्या ठिकाणी सॅनिटरी नॅपकीन माफक दरात पुरविणेबाबत – मा.हिराबाई घुले, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०३/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ०४ विषय क्रमांक - ०१

दिनांक – १७/०७/२०१८

सुचक : मा.आरती चोंधे अनुमोदक : मा.हिराबाई घुले

संदर्भ : मा.आरती चोंधे, मा.हिराबाई घुले यांचा प्रस्ताव -

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत दीड वर्षे पुर्ण व दहा वर्ष पुर्ण झालेल्या बचतगटांस अर्थसहाय्य देणे या दोन योजना कार्यरत आहेत. या दोन्ही योजनांच्या अटीशर्तीनुसार बचतगट नियमित असणे आवश्यक आहे. परंतु काही बचतगटामंध्ये काही अपरिहार्य कारणास्तव काही महिन्यांमध्ये मासिक बचत बँकेत जमा होत नाही परंतु बचतगट हा सुरळीतपणे चालू असतो. केवळ बचत नियमित नाही म्हणून असे बचतगट महानगरपालिकेकडून मिळणा-या अनुदानापासून वंचित राहू नये यासाठी सदरच्या योजनेत खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | मुळ योजना | सुधारीत योजना |
|---|---|---|
| १ | सदर अर्थसहाय्य मिळविण्याकरीता महिला बचतगटांचे बँकमध्ये बचत खाते सुरु केल्याच्या महिन्यापासून पुढील दीड वर्ष बचत गट कार्यरत असणे आवश्यक राहील. त्याकरीता बचतगटांच्या बँक पासबुकची अद्ययावत प्रत सादर करणे आवश्यक राहील. | सदर अर्थसहाय्य मिळविण्याकरीता महिला बचतगटांचे बँकमध्ये बचत खाते सुरु केल्याच्या महिन्यापासून पुढील दीड वर्ष बचत गट कार्यरत असणे आवश्यक राहील. त्याकरीता बचत गटांच्या बँक पासबुकची अद्ययावत प्रत सादर करणे आवश्यक राहील. |
| २ | बचतगटातील सर्व महिला सभासदाचे वास्तव्य पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीत असणे आवश्यक राहील. त्याकरीता प्रत्येक महिला सभासदाचे रेशनिंग कार्ड, लाईट बील, घरपटटी पावती, मतदान ओळखपत्र इ. सादर करणे आवश्यक राहील. | पिंपरी चिंचवड मनपाहददीतील रहिवासी असल्याबाबतचा पुरावा, वैयक्तिक ओळखपत्र म्हणून केवळ आधारकार्ड ग्राहय धरले जाईल. तरी अर्जासोबत आधारकार्डची प्रत सादर करावी. अतिरिक्त पुरावा म्हणून निवडणूक ओळखपत्र/मतदार नोंदणी यादीची प्रत सादर करणे आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | राष्ट्रीयीकृत बँक/पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक यामध्ये बचत खाते असलेल्या बचतगटांना या योजनेचा लाभ एकदाच देण्यात येईल. | राष्ट्रीयीकृत बँक/पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक यामध्ये बचत खाते असलेल्या बचतगटांना या योजनेचा लाभ एकदाच देण्यात येईल. |
| ४ | या निधीचा उपयोग ग्रुप फोटो, सर्व सभासदांचे तपशीलपत्र (स्वाक्षरी नाव, मोबाईल नंबर) | या निधीचा उपयोग ग्रुप फोटो, सर्व सभासदांचे तपशीलपत्र (स्वाक्षरी नाव, मोबाईल नंबर) |
| ५ | या निधीचा उपयोग बचतगटांचे व्यवस्थापन,बचतगटाचे बळकटीकरणकरणे, बचतगटाचे अंतर्गत कर्ज व्यहाराकरीता तसेच यशस्वीपणे कार्य करणा-या व्यवसाय उद्योगधंदा करणा-या बतचगट/ संस्थांच्या कामाची माहिती घेणेकामी अभ्यासदौरा आयोजीत करणे इ.साठी करता येईल. | या निधीचा उपयोग बचतगटांचे व्यवस्थापन, बचतगटाचे बळकटीकरण करणे, बचतगटाचे अंतर्गत कर्ज व्यहाराकरीता तसेच यशस्वीपणे कार्य करणा-या व्यवसाय उद्योगधंदा करणा-या बतचगट/संस्थांच्या कामाची माहिती घेणेकामी अभ्यासदौरा आयोजीत करणे इ.साठी करता येईल. |
| ६ | सदर बचतगटातील महिला इतर बचतगटात सभासद असल्यास अथवा इतर बचतगटातील महिला दुस-या बचतगटात पुर्नगठीत करण्यात आला असल्याबाबत बचतगटाच्या ठरावाची प्रत सादर करणे आवश्यक आहे. | सदर बचतगटातील महिला इतर बचतगटात सभासद असल्यास अथवा इतर बचतगटातील महिला दुस-या बचतगटात पुर्नगठीत करण्यात आला असल्याबाबत बचतगटाच्या ठरावाची प्रत सादर करणे आवश्यक आहे. |
| ७ | बचतगटातील प्रत्येक महिला सभासदाचे आधारकार्ड जोडावे | बचतगटातील प्रत्येक महिला सभासदाचे आधारकार्ड जोडावे |
| ८ | - | वर्षातून जास्तीत जास्त ३ वेळा अनियमित बचत नोंद ग्राहय धरणेत येईल. ( दीड वर्ष व दहा वर्ष पुर्ण झालेल्या महिला बचतगटांसाठी ) |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०५ विषय क्रमांक - ०२

दिनांक – १७/०७/२०१८

सुचक : मा.आरती चोंधे अनुमोदक : मा.स्वाती काटे

संदर्भ : मा.हिराबाई घुले, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळा कार्यालये व आवश्यक त्या ठिकाणी सॅनिटरी नॅपकीन माफक दरात पुरविणेसाठी व्हेडिंग मशीन बसविणे आवश्यक आहे. त्यासाठी वेगवेगळया पध्दतीच्या व्हेडिंग मशीनचे प्रात्यक्षिक दाखविणेसाठी ए.जी.सुळे कंपनी तसेच इतर कंपन्यांना एकाच दिवशी बोलविण्यास व त्यानंतर जे मशीन योग्य वाटेल त्यानुसार सदर कंपनीस वरील काम नियमानुसार देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४५२/२०१८
दिनांक : १७/०७/२०१

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.